महाराष्ट्र शासन

# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी क्र. ०२२-६८५९७४१०,
ई-मेल – desk10@dtemaharashtra.gov.in, वेबसाईट: https:// dte.maharashtra.gov.in

क्रमांक : १०/एनजीपी/पीसीआय/अंतिम मान्यता /२०२३-२४/ ६१ दिनांक 20 FEB 2024

कार्यालयीन आदेश :

विषय : फार्मसी कौंसिल ऑफ इंडिया, नवी दिल्ली व शासन मान्यतेस अनुसरून शैक्षणिक वर्ष २०२३-२४ पासून विनाअनुदान तत्वावर नवीन पदविका संस्था सुरु करण्यासाठी मान्यतेबाबत...

संदर्भ :
१. उच्च व तंत्रशिक्षण विभाग, शासन निर्णय क्रमांक: E-६४८१६०-HTED-१४०२५/११/२०२३-MHT-TE-५, दिनांक : ३१.०७.२०२३
२. उच्च व तंत्रशिक्षण विभाग, शासन निर्णय क्रमांक: E-६५३६०८-HTED-१४०२५/११/२०२३-MHT-(TE-५), दिनांक : ०७.०८.२०२३.
३. उच्च व तंत्रशिक्षण विभाग, शासन निर्णय क्रमांक: E-६२८४६१६-HTED-१४०२५-१०/२०२३-MHT-(TE-५), दिनांक : ३०.०६.२०२३
४. उच्च व तंत्रशिक्षण विभाग, शासन निर्णय क्रमांक: E-६५९२१६-HTED-१४०२५/११/२०२३-MHT-(TE-५), दिनांक : २३.०८.२०२३
५. उच्च व तंत्रशिक्षण विभाग, शासन निर्णय क्रमांक: E-६५१३८८/HTED/२०२३/MHT(TE-५), दिनांक : ३१.०७.२०२३
६. उच्च व तंत्रशिक्षण विभाग, शासन निर्णय क्रमांक: E-६५७८३३-HTED-१४०२५/११/२०२३-MHT-(TE-५), दिनांक : २१.०८.२०२३

फार्मसी कौंसिल ऑफ इंडिया नवी दिल्ली या शिखर परिषदेच्या मान्यतेस अनुसरून शासनाने संदर्भाधीन शासन निर्णयान्वये सोबतच्या "विवरणपत्र अ" मध्ये शैक्षणिक वर्ष २०२३-२४ पासून कायम विनाअनुदानित तत्वावर औषधनिर्माणशास्त्र पदविका अभ्यासक्रमाची नवीन संस्था सुरु करण्यास मान्यता दिलेली आहे. त्यानुसार सोबतच्या "विवरणपत्र अ" संस्थांनी संदर्माधीन शासन निर्णयात नमूद केलेल्या अटी व शर्तीच्या पुर्ततेबाबतची कागदपत्रे या संचालनालयास उपलब्ध करुन दिली आहेत. संबंधित संस्थांनी शासन निर्णयात नमूद केलेल्या अटी व शर्ती यांचे पालन करण्याबाबतचे हमीपत्र, शासन निर्णय क्रमांक टीईएम-२०१८/प्र.क्र.२३/तांशि-४ दि. २२ फेब्रुवारी २०१८ अन्वये, संयुक्त खात्यात १० वर्ष मुदतीची मुदतठेव व निर्धारीत केलेले नोंदणी शुल्क इ. बाबतची कागदपत्रे सादर केली आहेत. तसेच महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई यांनी शैक्षणिक वर्ष २०२३-२४ करीता संलग्नता प्रदान केलेली आहे.

उपरोक्त वस्तुस्थिती विचारात घेऊन संदर्भीन शासन निर्णयात विहित केलेल्या अटी व शर्ती सह खालील अटी व शर्तीच्या अधीन राहून शैक्षणिक वर्ष २०२३-२४ पासून सोबतच्या "विवरणपत्र अ" मध्ये दर्शविलेल्या कायम विनाअनुदानित तत्वावर औषधनिर्माणशास्त्र पदविका अभ्यासक्रमाची नवीन संस्था सुरु करण्यास मान्यता देण्यात येत आहे. तसेच अभ्यासक्रमामध्ये विद्यार्थ्यांना विहित पध्दतीने प्रवेश देण्यास या संचालनालयाकडून परवानगी देण्यात येत आहे.

१. संचालक, किंवा त्यांचे प्रतिनिधी यांना फार्मसी कौंसिल ऑफ इंडिया, नवी दिल्ली तसेच शासनाच्या मानकाप्रमाणे जागा, इमारत, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी व इतर सोयीसुविधा उपलब्ध आहेत किंवा कसे याबाबत संस्थेत केव्हाही अचानक भेट देऊन तपासणी करण्याचे अधिकार राहतील.

२. शुल्क नियामक प्राधिकरणाने/ फी निश्चिती समितीने निश्चित केलेल्या शुल्कासंबंधीत व संस्थेची इतर अनिवार्य बाबीसंबंधीची माहिती संस्था वेळोवेळी संस्थेच्या संकेतस्थळावर अद्ययावत करतील. तसेच संचालनालयाने निर्देशित केलेली माहिती संस्थांना संचालनालयामार्फत विकसित केलेल्या प्रवेश क्षमता मान्यतेच्या पोर्टलवर अद्ययावत करणे अनिवार्य राहील.

३. संबंधित पदविका अभ्यासक्रमांची तंत्रशिक्षण संचालनालय यांचेकडे नोंदणी व तद्‌अनुषंगिक कार्यवाही करणे आवश्यक राहील.

४. शासन, फार्मसी कौंसिल ऑफ इंडिया, नवी दिल्ली व या संचालनालयाने वेळोवेळी ठरवून दिलेल्या अटी व शर्तीचे संस्था उल्लंघन करीत असल्यास सदरची संस्था बंद करण्याचे अधिकार शासन / फार्मसी कौंसिल ऑफ इंडिया, नवी दिल्ली, यांना राहतील.

५. शासन निर्णय क्रमांक टीईएम-२०१८/प्र.क्र.२३/तांशि-४ दि. २२ फेब्रुवारी २०१८ अन्वये ज्या बाबींसाठी दुस-या वर्षासाठी संयुक्त खात्यात मुदतठेव विहित केलेली आहे, अशा बाबींसाठी संबंधित संस्थांनी दुसरे शैक्षणिक वर्ष सुरू होण्यापुर्वी संस्थेचे अध्यक्ष / सचिव व संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे संयुक्त नांवे १० वर्षासाठीची मुदतठेवीची पावती पडताळणीसाठी संबंधित तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालयाकडे सादर करणे अनिवार्य राहील.

६. ज्या सस्थांच्या अभ्यासक्रमांना महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई यांनी संलग्नता अटी व शर्तीच्या अधिन राहून प्रदान केली असल्यास संलग्नतेच्या आदेशातील अटी व शर्तीची पुर्तता संबंधित संस्थांना करणे बंधनकारक राहील. तसेच संबंधित संस्थांना मंडळाच्या नियमांप्रमाणे नियमित संलग्नता घेणे बंधनकारक राहील.

७. आग प्रतिबंधक प्रमाणपत्राचे सक्षम प्राधिकाऱ्यांकडून वेळोवेळी नुतनीकरण करणे अनिवार्य राहील.

८. विद्यार्थी, विद्यार्थीनी, महिला, मागासवर्गीय व सर्वसाधारण अधिकारी/ कर्मचारी यांच्या तक्रारींचे निवारण करण्याकरीता शिखर परिषद/ शासन/ महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ यांचे निर्देशानुसार स्वतंत्र समित्या गठित करणे अनिवार्य राहील.

उपरोक्त सर्व अटी व शर्ती, शासन निर्णयातील सर्व अटी व शर्ती तसेच या व्यतिरीक्त वेळोवेळी शासन / संचालनालय यांनी निर्गमित केलेल्या आदेशांचे काटेकोर पालन करणे विवरणपत्र "अ" मधील संस्थांना बंधनकारक राहील.

(डॉ.विनोद मोहितकर)
संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रत : मा. प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२ यांना माहितीसाठी सादर.

प्रत माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी अग्रेषित :

१. सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, छत्रपती संभाजीनगर/नागपूर/ नाशिक/ पुणे. (ईमेलव्दारे)
२. संचालक, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई.
३. उपसचिव, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, विभागीय कार्यालय, छत्रपती संभाजीनगर/नागपूर/पुणे.
४. संबंधित संस्था (संबंधित विभागीय कार्यालयामार्फत)
५. कायासन क्र.३ आयटी सेल, मुख्य कार्यालय, मुंबई.
६. निवड नस्ती.

क्र.१०/एनजीपी[illegible]ीआय/अंतिम मान्यता/२०२३-२४/ ६१ . दि. २०/०२[illegible]२४ सोबतचे सहपत्र

## विवरणपत्र अ

### फार्मसी कौंसिल ऑफ इंडिया, नवी दिल्ली व शासन मान्यतेस अनुसरून शैक्षणिक वर्ष २०२३-२४ पासुन विनाअनुदान तत्वावर नवीन पदविका संस्था सुरु करण्यासाठी मान्यतेबाबत

| अ.क्र. | कोटीई संकेतांक | पीसीआय संकेतांक | शैक्षणिक संस्थेचे नांव | शैक्षणिक संस्थेचा पत्ता | विभाग | जिल्हा | शासन मान्यतेचा शासन निर्णय व दिनांक | अभ्यासक्रमाचे नांव | प्रवेश क्षमता | विद्यापीठ / मंडळ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | **छत्रपती संभाजीनगर विभाग** | | | | | |
| १ | २६४२ | PCI-७७६१ | गुरु मिश्री कॉलेज ऑफ फार्मसी | शेलगाव, ता.बदनापूर, जालना, पिन कोड - ४३१२०२ | छत्रपती संभाजी नगर | जालना | उच्च व तंत्रशिक्षण विभाग, शासन निर्णय क्रमांक: E-६४८१६०-HTED-१४०२५/११/२०२३-MHT-TE-५, दिनांक : ३१.०७.२०२३ | औषधनिर्माणशास्त्र पदविका अभ्यासक्रम | ६० | महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई |
| २ | २६५७ | PCI-८४५३ | अरमान इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी | शिरुर अनंतपाळ, ता. शिरुर अनंतपाळ, जि. लातूर, पिन कोड-४१३५४४. | छत्रपती संभाजी नगर | लातूर | उच्च व तंत्रशिक्षण विभाग, शासन निर्णय क्रमांक: E-६५७८३३-HTED-१४०२५/११/२०२३-MHT-(TE-५), दिनांक : २१.०८.२०२३ | औषधनिर्माणशास्त्र पदविका अभ्यासक्रम | ६० | महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई |
| | | | | | **नागपूर विभाग** | | | | | |
| ३ | ४६८६ | PCI-५५०१ | माहेश्वरी इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी डी.फार्म | गाव उटी (भिवापूर), उमरेड रोड, नागपूर, पिन कोड - ४११२०९ | नागपूर | नागपूर | उच्च व तंत्रशिक्षण विभाग, शासन निर्णय क्रमांक: E-६५३६०८-HTED-१४०२५/११/२०२३-MHT-(TE-५), दिनांक : ०७.०८.२०२३ | औषधनिर्माणशास्त्र पदविका अभ्यासक्रम | ६० | महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई |
| | | | | | **नाशिक विभाग** | | | | | |
| ४ | ५५०७ | PCI-६३७८ | पी.व्ही. बेल्हेकर कॉलेज ऑफ फार्मसी | मु.पो. भानशिवरे, ता. नेवासा, जि. अहमदनगर, पिन कोड-४१४६०९ | नाशिक | अहमदनगर | उच्च व तंत्रशिक्षण विभाग, शासन निर्णय क्रमांक: E-६२८४६१६-HTED-१४०२५-१०/२०२३-MHT-(TE-५), दिनांक : ३०.०६.२०२३ | औषधनिर्माणशास्त्र पदविका अभ्यासक्रम | ६० | महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई |
| ५ | ५५३३ | PCI-८५१३ | डॉ.देवराव दिगंबर वराट कॉलेज ऑफ फार्मसी | A/P साकट ता. जामखेड जि. अहमदनगर, पिन कोड - ४१३२०१ | नाशिक | अहमदनगर | उच्च व तंत्रशिक्षण विभाग, शासन निर्णय क्रमांक: E-६५९२१६-HTED-१४०२५/११/२०२३-MHT-(TE-५), दिनांक : २३.०८.२०२३ | औषधनिर्माणशास्त्र पदविका अभ्यासक्रम | ६० | महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई |

(डॉ. विनोद मोहितकर)
संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, मुंबई

क्र.१०/एनजीपी आय/अंतिम मान्यता /२०२३-२४/ ६७ , दि. २०/०२ २४ सोबतचे सहपत्र

विवरणपत्र अ

फार्मसी कौंसिल ऑफ इंडिया, नवी दिल्ली व शासन मान्यतेस अनुसरुन शैक्षणिक वर्ष २०२३-२४ पासुन विनाअनुदान तत्वावर नवीन पदविका संस्था सुरु करण्यासाठी मान्यतेबाबत

| अ.क्र. | डीटीई सांकेतांक | पीसीआय सांकेतांक | शैक्षणिक संस्थेचे नाव | शैक्षणिक संस्थेचा पत्ता | विभाग | जिल्हा | शासन मान्यतेचा शासन निर्णय व दिनांक | अभ्यासक्रमाचे नांव | प्रवेश क्षमता | विद्यापीठ / मंडळ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| पुणे विभाग | | | | | | | | | | |
| ६ | १६५०१ | PCI-६८१४ | एजल कॉलेज ऑफ फार्मसी | तरणी कॉलनी, संजय हुकडे शोरुमच्या मागे, पुणे-सोलापूर रोड, हडपसर, पुणे, पिन कोड - ४११०२८ | पुणे | पुणे | उच्च व तंत्रशिक्षण विभाग, शासन निर्णय क्रमांक: E-६५१२८८/HTED/२०२३/MHT(TE-५), दिनांक : ३१.०७.२०२३ | औषधनिर्माणशास्त्र पदविका अभ्यासक्रम | ६० | महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई |
| ७ | १६११४ | PCI-८५२२ | शहीद सीताराम कॉलेज ऑफ फार्मसी | मु.पो. शिटवे, ता. राधानगरी, जि. कोल्हापूर, पिन कोड-४१६२०८. | पुणे | कोल्हापूर | उच्च व तंत्रशिक्षण विभाग, शासन निर्णय क्रमांक: E-६५९२१६-HTED-१४०२५/११/२०२३-MHT-(TE-५), दिनांक : २३.०८.२०२३ | औषधनिर्माणशास्त्र पदविका अभ्यासक्रम | ६० | महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई |

(डॉ. विनोद मोहितकर)
संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, मुंबई